# नि. २५ वरील आदेश

सदरचा अर्ज हा वादी यांनी प्रतिवादी क्र. २ यांच्या नि. १७ वरील सि.पी.सी आ.७ रु. ११ ड प्रमाणे केलेल्या अर्जामध्ये वादी विरुध्द झालेल्या वर झालेल्या विना म्हणणे अर्ज चालविणेचा आदेश रद्द करणेसाठी केलेला आहे. अर्जातील कथन पुढील प्रमाणे, सदर वादी यांनी त्यांचे माहितगार वकिल यांना वेळेमध्ये माहिती न दिल्याने वादी यांना म्हणणे दाखल करणे अशक्य झाले होते. तसेच न्यायाच्या दृष्टीने वादी विरुध्द झालेला आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र. २ यांच्या नि. १७ वरील अर्जास म्हणणे दाखल करुन घेणे उचित ठरेल.

सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविले. प्रतिवादी क्र. १ यांनी सदरचा अर्ज व त्यातील कथने प्रतिवादीस मान्य व कबुल नाहीत तसेच यदा कदाचित हा अर्ज मंजूर करणेचा झालेस वादींवर जास्तीत–जास्त खर्च बसविणेत यावा.

प्रतिवादी क्र. २ यांनी देखील अर्जातील कथने मान्य व कबुल नाहीत असे म्हणणे देवून वादींची चालढकलीची वृत्ती दिसून येत आहे असे नमुद केले आहे.

अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे वकीलांचे म्हणणे नुसार त्यांना पक्षकाराकडून माहिती वेळेत उपलब्ध झाली नाही. सदरचे कारण हे हा अर्ज मंजूर करण्यासाठी (sufficient cause) पुरेसे वाटत नाही, अशा बाबींमुळे न्यायालयाच्या प्रक्रियेस विलंब होण्याची शक्यता असते. परंतू न्यायाच्या हिताच्या दृष्टीने वादी यांना एक संधी देणे क्रमप्राप्त वाटते. तसेच नि. १७ वरील प्रतिवादी यांचा अर्ज हा सि.पी.सी आ.७ रु. ११ ड प्रमाणे दावा फेटाळण्यासाठी (rejection of plaint) असलेने त्यावर वादींचे म्हणणे मागवून घेणे नैसर्गिक न्याय तत्वांचे प्रमाणे क्रमप्राप्त ठरेल. तथापी प्रतिवादींचे म्हणणे नुसार वादीवर खर्च न लावता उभयपक्षांना पुढील तारखेस नि. १७ वरील अर्जावर युक्तीवाद करण्याचा आदेश देणे न्यायाच्या दृष्टीने योग्य ठरेल. वरील बाबींचा विचार करुन खालील आदेश पारीत करण्यात येत आहेत.

## आ दे श

१. अर्जदारचा नि. २५ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. उभय पक्षांनी नि. १७ वरील अर्जावर पुढील तारखेस कोणत्याही परिस्थितीत युक्तीवाद करावा असे आदेश उभयपक्षांना देण्यात येतात. सदर आदेशाची उभयपक्षांनी नोंद घ्यावी.

३. सदर अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट करण्यात यावा.

sd/-

सांगली. ( श्री. ओ. एस. शास्त्री )

दिनांक – ०५/०२/२०२४. ११ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.